# प्रेसनोट

दि. ३१/०५/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | शेवगाव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गुरनं.४८६/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय | पांडुरंग बाबुराव वीर, पोलीस हवालदार, बक्कल नं.९२५, वर्ग–३, नेमणुक शेवगाव पोलीस स्टेशन, ता.शेवगांव, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५,०००/– ते १०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ––– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचेविरूध्द शेवगाव पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या तक्रारी अर्जाच्या चौकशीवरून तक्रारदार यांचेविरूध्द कारवाई न करण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक पांडुरंग बाबुराव वीर, पोलीस हवालदार, बक्कल नं.९२५, वर्ग–३, नेमणुक शेवगाव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर हे लाच मागणी करत असलेबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर कार्यालयाकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीवरून दि.१२/०३/२०२४ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली असता लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक वीर यांनी तक्रारदार यांच्यावर कारवाई न करण्यासाठी इतर पोलीसाने पाच–दहा हजार रूपये घेतले असते, दयायचे तुमच्या मनाने, हिशोबा हिशोबाने दया, असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. सदर बाबत तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी लोकसेवक पांडुरंग बाबुराव वीर यांचेविरूध्द दि.३१/०५/२०२४ रोजी शेवगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४८६/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००


(प्रविण लोखंडे)

पोलीस उप अधीक्षक,

ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर